# घटक : १

# राज्यशास्त्र - अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

    १.२.१ राज्यशास्त्राचा अर्थ

    १.२.२ राज्यशास्त्राचे स्वरूप

    १.२.३ राज्यशास्त्राची व्याप्ती

१.३ पारिभाषिक शब्द

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- राज्यशास्त्राचा अर्थ समजून घेता येईल.
- राज्यशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- राज्यशास्त्राची व्याप्ती स्पष्ट होईल.

## १.१ प्रास्ताविक

मनुष्य हा स्वभावत: एक सामाजिक प्राणी आहे व समाजशील प्राणी असल्यामुळे मनुष्य समाजातच आपले जीवन जगत असतो. प्रत्येक मनुष्याची व्यक्तिगत प्रगती सामाजिक जीवनावर आधारित असते म्हणून तो समूह करून राहू लागला. मानवाच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी विविध प्रकारच्या संस्था निर्माण झाल्या. उदा. कुटुंब संस्था, विवाह संस्था, शिक्षण संस्था, धार्मिक संस्था अशा विविध स्वरूपाच्या संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यातूनच व्यक्ती संस्था आणि संस्था - संस्था असे परस्पर संबंध निर्माण झाले. समाजव्यवस्थेत राहणाऱ्या व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी संबंध येत असताना काही प्रमाणात संघर्ष होऊ लागले. हे संघर्ष थांबविण्यासाठी नियंत्रणाची गरज भासू लागली. त्यामुळे मानवाच्या समाजजीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती करण्यात आली. सोफिस्टांच्या मते 'मनुष्य राजकीय प्राणी' असल्यामुळे समाज राजकीय स्वरूपाचा झाला. निश्चित अशा भुप्रदेशात राजकीय दृष्ट्या संघटित झालेल्या लोकांची सार्वभौम शासन संस्था निर्माण झाली. राज्याशास्त्राला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्याचे श्रेय ग्रीक तत्त्वज्ञांनाकडे जाते. धर्मशास्त्र, पुराण, नीतिशास्त्र यांच्यापासून राज्यशास्त्राला स्वतंत्र करून त्याला स्वतंत्र सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देण्याचे श्रेय ॲरिस्टॉटलकडे जाते म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक असे म्हटले जाते. या राज्यशास्त्राच्या अर्थ, स्वरूप व व्याप्तीचा अभ्यास आपण या घटकामध्ये करणार आहे.

### १.२.१ राज्यशास्त्राचा अर्थ (व्याख्या) (Definition of Political Science)

ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथाचे नाव 'पॉलिटिक्स' असे दिले, तेव्हापसून 'राज्यकारभाराचे शास्त्र' म्हणून पॉलिटिक्स हा शब्द प्रचलित झाला. राजकारण आणि राज्यशास्त्र या दोन्ही अर्थानी पॉलिटिक्स ही एकच संज्ञा बरीच वर्षे वापरात येत असे. पुढे राज्यशास्त्रासाठी 'पॉलिटिकल' अशी संज्ञा रूढ करण्यात आली. मूल्यांच्या संदर्भात राजकीय प्रश्नांचे चिंतन करणारे राजकीय विचारवंत व दैनंदिन राजकारणाच्या प्रक्रियांमध्ये वावरणारे क्रियाशील राजकारणी नेते आणि राजकीय मूलतत्त्वे, घडामोडी व राजकीय वर्तन यांचा शास्त्रीय दृष्टीने विचार करणारे राज्यशास्त्राचे विद्यार्थी यांच्या दृष्टीकोनांत स्वाभाविकच फरक असणार हे गृहीत धरून राज्यशास्त्राच्या शाखांचा विस्तार झाला. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला ''शास्त्रांचे शास्त्र'' असे म्हणतो. त्याच्या काळाशी ते संबोधन सुसंगतच होते. राज्य आणि समाज यांच्यातील भेद ग्रीक नगरराज्यांमध्ये केला जात नसल्यामुळे राज्याचे क्षेत्र सामाजिक जीवनाला स्पर्श करण्या इतपत व्यापक होते. पॉलिस (Polise) (नगरराज्य) आणि पोलिटिका (राज्यशास्त्र) या दोहोंची व्याप्ती सारखीच असल्यामुळे राज्यशास्त्र हे 'शास्त्रांचे शास्त्र म्हणवले जात असे'. या काळातील समाज जीवनात व्यक्तिगत आणि सार्वजनिक असा भेद कोणत्याच बाबतीत निर्माण झालेला नसल्यामुळे आणि सामुदायिक जीवनाची विविध क्षेत्रे एकमेकांपासून वेगळी झालेली नसल्यामुळे नगरराज्याच्या नागरिकाचे कोणतेही वर्तन या ना त्या संदर्भात राजकीय ठरत असे, कारण त्या वर्तनाचा सामुदायिक सहजीवनावर प्रभाव पडणे अनिवार्यच ठरत असे. आपल्याकडे

महाभारताच्या शांतिपर्वात सुद्धा असा उल्लेख आढळतो की 'हत्तीच्या पावलाच्या खुणांमध्ये अन्य सर्व प्राण्यांच्या पाऊलखुणा जशा सामावून जातात त्याप्रमाणे राज्यशास्त्राच्या व्याप्तीमध्ये सर्व शास्त्रे सामावतात.

आधुनिक विचारवंतांनी राज्यशास्त्राचा अभ्यास वास्तववादी व विश्लेषणात्मक पद्धतीने केलेला आहे. त्यामुळे राज्यशास्त्राचा अभ्यास औपचारिक व अनौपचारिक असा दोन्ही पद्धतीने सुरू झाला. राजकीय क्रिया, प्रक्रियांचा, राजकीय संकल्पनांचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने वास्तववादी दृष्टिकोणातून होऊ लागला. राज्यशास्त्राची निश्चित व्याख्या करणे कठीण झाले. विविध विचारवंताने राज्यशास्त्राची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या पुढीलप्रमाणे -

**१) आर. जी. गेटेल यांच्या मते**

''ऐतिहासिक दृष्टिकोनातून भूतकाळात राज्य कसे होते, वर्तमानकाळात राज्य कसे आहे आणि नैतिकदृष्ट्या भविष्यकाळात राज्य कसे असावे या संबंधीचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला 'राज्यशास्त्र' असे म्हणतात.''

**२) प्रा. सीली यांच्या मते**

'ज्या प्रमाणे अर्थशास्त्रात संपत्तीचा प्राणिशास्त्रात जीविताचा, बीजगणितात अंकांचा आणि भूमितीत स्थळ आणि उंची यांचा शोध घेतला जातो. त्याप्रमाणे राज्यशास्त्रात शासन संस्थेच्या तत्त्वांचा शोध घेतला जातो.'

**३) पॉल जेनेट यांच्या मते**

'राज्यशास्त्र हा सामाजिक शास्त्राचा असा भाग आहे की, ज्यामध्ये राज्याची आधारभूत तत्त्वे आणि शासन संस्थेची मूलभूत तत्त्वे यांचा विचार केला जातो.'

**४) जे. डब्ल्यू. गार्नर यांच्या मते**

'राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा प्रारंभ राज्यापासून होऊन त्याचा शेवटही राज्याच्या अभ्यासातच होतो.'

**५) पेनॉक आणि स्मिथ यांच्या मते**

'शासन संस्था आणि राजकीय प्रक्रिया यांचे स्वरूप काय आहे, ते कसे असावे आणि त्यांच्यात एकरूपता कशी साधता येईल या उद्देशाने सुव्यवस्थितपणे केलेला अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र होय.'

**६) रॉबर्ट डाल यांच्या मते**

'राज्यशास्त्रात राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला जातो, राजकीय व्यवस्था म्हणजे मानवी संबंधाचा असा आकृतीबंध की ज्यामध्ये नियंत्रण, प्रभाव, सत्ता आणि अधिकार यांचा अविष्कार घडून येत असतो.'

एकंदरीत राज्यासंबंधी, राजकीय व्यवस्थेसंबंधी असणाऱ्या सर्व व्यवहारांचा घटनांचा, सिद्धांत, संकल्पना आणि क्रिया - प्रक्रिया यांचा अभ्यास करणारे शास्त्र ते राज्यशास्त्र असे म्हणता येईल.

## १.२.२ राज्यशास्त्राचे स्वरूप (Nature of Political Science)

राज्यशास्त्राचे स्वरूप समजावून घेताना राजकारण राज्यशास्त्र आणि राजकीय तत्त्वज्ञान या संकल्पनांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. ॲरिस्टॉटलने ग्रीक नगरराज्याच्या राज्यकारभारासंबंधी अभ्यास करताना 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ लिहला. सद्यकालीन राजकीय क्रिया-प्रक्रिया बोलताना राजकारण हा शब्द वापरला जातो. देशातील विद्यमान राजकीय घडामोडी, राजकीय प्रश्न व त्यावरील उपाययोजना, राजकीय वातावरण, राजकीय डावपेच, राजकीय खेळी इत्यादीसाठी राजकारण हा शब्द वापरला जातो. आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी राजकारण ऐवजी राज्यशास्त्र हा शब्द वापरला आहे. राज्यशास्त्र म्हणजे राज्यासंबंधीचे शास्त्र होय. राज्य, राज्याचा उदय, विकास, शासनसंस्था, त्याचे अधिकार, कार्ये, नागरिक व राज्य यांचे संबंध नागरिकांचे अधिकार, आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादीबाबत राज्यशास्त्र अभ्यास करते राजकीय तत्त्वज्ञानात तात्त्विक व वैचारिक दृष्टिकोणातून राजकीय विचार मांडले जातात. राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत या दोहोत फरक करणे कठीण आहे. काही विचारवंताने राजकीय तत्त्वज्ञान हा शब्द राजकीय सिद्धांत या अर्थाने वापरतात. प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅक्रियाव्हेली, मिल, लास्की, कार्ल मार्क्स, रॉबर्ट डाल इत्यादी विचारवंतांनी राजकीय विचारांना तात्त्विक व सैद्धांतिक बैठक दिली आहे.

राज्यशास्त्राच्या स्वरूपाचे तीन कालखंड आढळून येतात -

१) पारंपारिक राज्यशास्त्राचे स्वरूप (इ.स. १८५० पूर्वीचा कालखंड)

२) संक्रमण काळातील राजकीय विचार (इ. १८५० ते १९५० चा कालखंड)

३) आधुनिक राजकीय विचारसरणी (इ.स. १९५० नंतरचा कालखंड)

### १) पारंपारिक राज्यशास्त्राचे स्वरूप

राज्यशास्त्र हे प्राचीन काळापासून अभ्यासले जाणारे शास्त्र आहे. इ.स. पूर्व चौथ्या शतकापासून राज्यशास्त्राची एक अभ्यासशाखा म्हणून अभ्यास सुरू झाला. ग्रीक नगरराज्यात प्लेटो, ॲरिस्टॉटल यासारख्या विचारवंतानी राज्यशास्त्राला प्रतिष्ठा मिळवून दिली. प्लेटोने त्याच्या 'दि. रिपब्लीक' तर ॲरिस्टॉटलने त्याच्या 'पॉलिटिक्स' या ग्रंथात राज्य-विषयक विचार मांडले. या काळातील राज्यशास्त्र हे नगरराज्यांचा अभ्यास करीत होते. प्राथमिक अवस्था संपून नागरी, प्रगत जीवनास सुरूवात झाली होती. या काळातील नगरराज्ये आकाराने छोटी होती. मर्यादित भौगोलिक आकार, माफक लोकसंख्या, मर्यादित प्रश्न व गरजा,

विज्ञान तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे राज्यशास्त्रा समोर फारसे विचार मंथन होण्याची गरज नव्हती. राज्याने आमचे संरक्षण करावे अशी मागणी होती.

राजा, राज्य व संरक्षण व्यवस्था या प्रमुख तीन गोष्टीवर त्यावेळचे राज्यशास्त्र आधारित होते. प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथात तत्त्वज्ञ राजाची व आदर्श राज्यांची मांडलेली आदर्शवादी संकल्पना पारंपारिक राज्यशास्त्राचे स्वरूप दाखवते. ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या थोडे पुढे जावून अधिक चांगली शासनपद्धती कोणती याचा तुलनात्मक व निरिक्षणावर आधारीत अभ्यास केला होता. ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे केलेले समर्थन हे पारंपारिक राज्यशास्त्राच्या सीमारेषा दाखवते. राजा व राजाची कर्तव्य, राजा व आदर्श राज्य संकल्पना, न्याय, संरक्षण इत्यादी महत्त्वाच्या विषयानांच तत्कालीन राज्यशास्त्राने स्पर्श केला होता. यातूनच पारंपारिक राज्यशास्त्राचे स्वरूप पुढील प्रमाणे होते.

**१) वर्णनात्मक स्वरूप**

पारंपारिक राज्यशास्त्र हे वर्णनात्मक होते. शास्त्रीय चिकित्सा, विश्लेषण करण्याऐवजी हे पारंपारिक राज्यशास्त्र वर्णनाला महत्त्व देत होते यात काल्पनिकता साहित्यिकी भाषा, अलंकारीता यांना विचारवंत महत्त्व देत.

**२) आदर्शवाद**

वस्तूस्थिती पेक्षा आदर्शानां अधिक महत्त्व दिल्यामुळे अनेक चुकीचे पोकळ आणि अयोग्य सिद्धांत व निष्कर्ष मांडले गेले. यामध्ये संख्यात्मक व तुलनात्मक पद्धतीचा वापर फार कमी प्रमाणात केला जात असे त्यामुळे परंपरागत राज्यशास्त्रातील काही सिद्धांत व तत्त्वे निरूपयोगी ठरली गेली.

**३) नैतिक**

पारंपारिक राज्यशास्त्रात मूल्ये, विचार, संस्कार व मानवतावादी धर्मग्रंथाचा सर्व समाजावर प्रभाव होता. त्यामुळे राज्यशास्त्रात पाप, पुण्य, निती, अनिती चांगले वाईट, सत्य, असत्य यावर भर देऊन फक्त चांगल्या गोष्टीचा स्वीकार केला जाई.

**४) शास्त्रीयतेचा अभाव**

पारंपारिक राज्यशास्त्राचे स्वरूप काल्पनिक होते. निरीक्षण, माहिती संकलन, विश्लेषण, चिकित्सा, कार्यकारणभावाचा शोध, प्रायोगिकता संख्याशास्त्रीयता, गणिती अचूकता, शास्त्रशुद्ध मांडणी, तंत्रज्ञानाचा आधार, शास्त्रीयता, मूल्यनिरपेक्षता, वस्तूनिष्ठता यातील कोणत्याच सूक्ष्म व निश्चित पद्धतीचा वापर केला जात नव्हता.

## ५) तार्किक

या काळात तत्त्वज्ञानाला समाजात महत्त्व होते. तार्किक आधारावर राजकीय क्रिया प्रक्रियांचे अर्थ बोधन केले जाई. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभूती वा निरिक्षणाला फारसा वाव नव्हता. आपल्याला केवळ एक आदर्श राज्य करायचे आहे. अशा प्रकारे तर्काच्या आधारावर बांधणी केली जाई.

## ६) संकुचित व मर्यादित स्वरूप

पारंपारिक राज्यशास्त्राचा अभ्यास संकुचित व मर्यादित स्वरूपाचा होता. राज्याचा उदय, राज्याचे घटक, राज्याची कार्ये, शासनपद्धती, राजकीय पक्ष, लोकमत असा मर्यादित स्वरूपाचा अभ्यास परंपरागत राज्यशास्त्रात केला जात.

थोडक्यात पारंपारिक राज्यशास्त्राचे स्वरूप हे वर्णनात्मक, आदर्शवादी, नैतिक, व्यक्तिवादी, तार्किक व काल्पनिक, संकुचित व मर्यादित स्वरूपाचे होते.

## २) संक्रमण काळातील राजकीय विचार

इ.स. १८५० ते १९५० हा राज्यशास्त्राचा संक्रमण कालखंड मानला जातो. या कालखंडात विविध राजकीय विचारवंतानी जे विचार मांडले त्याचा प्रभाव आधुनिक राज्यशास्त्रावर पडतो. संक्रमण काळातील राजकीय विचार पुढील प्रमाणे आहेत.

फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्तने समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून राज्यशास्त्राचा अभ्यास केला. सामाजिक व्यवहार आणि राजकीय व्यवहार यांच्या परस्पर संबंधाच्या अभ्यासातून राज्याची निर्मिती, विकास, अस्त यांचा अभ्यास करणे अधिक सोपे झाले. सामाजिक परिस्थितीचा प्रभाव राजकीय व्यवस्थेवर पडतो हे सांगून समाजाच्या संरक्षणासाठी राज्याची आवश्यकता आहे असे विचार मांडले. जर्मन विचारवंत कार्ल मार्क्सने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या ग्रंथात सामाजिक शास्त्रांचा एकमेकांशी कसा संबंध असतो याचा अभ्यास केला आहे. मार्क्सने शास्त्रीय समाजवादी समाजरचनेची नवी विचारसरणी मांडली. इतिहासाचे आर्थिक दृष्टिकोणातून विश्लेषण करून विरोधी  विकासवादी सिद्धांत मान्य करुन मार्क्सने समाजाच्या विकासाचे विश्लेषण केले आहे. मार्क्सने साम्यवादी समाजरचने संबंधीचे जे नवे राजकीय विचार मांडले ते आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने मोलाचे ठरले.

इंग्लिश विचारवंत हर्बर्ट स्पेन्सरने राज्याच्या स्वरूपाचा सेंद्रिय सिद्धांत मांडला. मानवी शरीरातील घटकांचे स्वरूप व कार्य आणि राज्याच्या घटकांचे स्वरूप व कार्य यांच्यातील साधर्म्यावरून स्पेन्सरने व्यक्तिवादाचे व व्यक्तिस्वातंत्र्याचे समर्थन केले. ग्रॅहॅमवालास या इंग्लिश विचारवंताने 'ह्यूमन नेचर इन पॉलिटिक्स' या ग्रंथात मानवी वर्तन आणि व्यवहार यांचे विश्लेषण केलेले आहे. वालासने मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून लोकशाहीचे विश्लेषण केले आहे. त्याने राज्यशास्त्राच्या अभ्यासाला तात्त्विक पातळीवरून व्यावहारिक पातळीवर आणून ठेवले आहे.

आर्थर बेंटले यांनीही वास्तववादी दृष्टिकोण स्वीकारून राज्यशास्त्राच्या अभ्यासाला नवी दिशा दिली. टॉलकॉट पार्सन्स यांनी 'सामाजिक व्यवस्था' हा ग्रंथ लिहून राजकीय व्यवस्थावाद व रचनात्मक कार्यवाद यांचे विश्लेषण केले. चार्लस मेरियम, हॅरॉल लॉसवेल यांनी सामाजिक शास्त्रांच्या तुलनात्मक अभ्यासावर भर देऊन राजकीय वर्तन, राजकीय श्रेष्ठीजन, सत्ताप्राप्ती इत्यादी विषयक विचार मांडले आहेत.

अशा प्रकारे विविध विचारवंतानी आपले विचार संक्रमण कालखंडात मांडले आहेत. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाला नवी दिशा मिळाली.

## ३) आधुनिक राजकीय विचारसरणी

इ.स. १९५० नंतरच्या काळात राज्यशास्त्राच्या अभ्यासाला वैज्ञानिक व आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. डेव्हीड ईस्टन, ग्रॅब्रियल आल्मंड, रॉबर्ट डाल, अँथनी जन्स, डेव्हीड ॲप्टर, पॉवेल, ल्युसियन पाय, कार्ल ड्वाईश, सिग्मंड न्यूमन या विचारवंतानी राज्यशास्त्राचा अभ्यास आधुनिक पद्धतीने सुरू केला. वैज्ञानिक, तुलनात्मक पद्धती, सामाजिक, आर्थिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोण, संख्यात्मक पद्धती इत्यादी पद्धतीचा स्वीकार करून राज्यशास्त्राचा अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने सुरू झाला. निरीक्षण, परीक्षण, संशोधन करून वास्तववादी दृष्टिकोणातून राज्यशास्त्रात निष्कर्ष काढले आहेत. आज नवनवीन राजकीय प्रश्न आणि गरजा निर्माण झाल्या आहेत. त्याची पूर्तता करण्यासाठी नव्या राजकीय व्यवस्थेची विचारसरणी पुढे आली आहे.

पुढील कारणांमुळे आधुनिक राजकीय विचारांचा उदय झाला.

१) विसाव्या शतकातील लोकशाही शासन पद्धतीने स्वरूप बदलून गेले. कारण प्रत्येक देशाची राजकीय परिस्थिती, इतिहास, संस्कृती, सामाजिक स्थिती, आर्थिक समस्या इत्यादी गोष्टी भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे लोकशाही शासन पद्धतीचा उपयोग काही देशात अयशस्वी झाला. पहिल्या महायुद्धानंतर युरोप खंडातील जर्मनी, इटली या देशात लोकशाही अयशस्वी होऊन तेथे हूकूमशाही निर्माण झाली. त्यामुळे आधुनिक राज्यशास्त्रात लोकशाही शासन पद्धतीच्या विश्लेषणाची गरज निर्माण झाली.

२) आधुनिक कालखंडात पारंपारिक राज्यशास्त्राच्या पद्धतीने अभ्यास करून चालणार नाही. आज 'राज्य' या संकल्पनेऐवजी 'राजकीय व्यवस्था' ही संकल्पना व्यापक अर्थाने स्वीकारलेली आहे. त्यामुळे राजकीय व्यवस्थेचा अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने होत आहे. राजकीय व्यवस्थावाद, रचनात्मक कार्यवाद, राजकीय संस्कृती, राजकीय समाजीकरण, राजकीय श्रेष्ठिजन, वर्तनवाद, उत्तरवर्तनवाद, राजकीय संसूचन, राजकीय विकास अशा अभ्यासाची गरज निर्माण झाली.

३) विसाव्या शतकात वसाहतीचे व साम्राज्यवादाचे राजकारण संपलेले आहे. अशिया, आफ्रिका खंडात अनेक नवोदित स्वतंत्र राष्ट्रे उदयाला आली. त्यामुळे तेथील राजकीय प्रश्न, राजकीय परिस्थिती भिन्न स्वरूपाची आहे. या नविन राष्ट्रांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणातील गटबाजी, शस्त्रास्त्र स्पर्धा, सत्ता स्पर्धा, शीतयुद्ध, अलिप्त राष्ट्रांचे राजकारण अशा विविध विषयांचा अभ्यास राज्यशास्त्राला करणे महत्त्वाचे आहे. रशियाचे झालेले विघटन व अमेरिका, चीन, भारत अशा राष्ट्रांचे वर्चस्व वाढत आहे. युरोपीय राष्ट्रांची आर्थिक व व्यापारी क्षेत्रात प्रभाव वाढत आहे. दहशतवादाची नवी समस्या निर्माण झाली आहे. अशा प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी राज्यशास्त्रात आधुनिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अभ्यास सुरू झाला.

## स्वयं-अध्ययन प्रश्न -१

पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

१) ॲरिस्टॉटलने ग्रीक नगरराज्याचा अभ्यास करताना 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ लिहला. (       )

२) आधुनिक राज्यशास्त्राचा अभ्यास १७५० च्या कालखंडानंतर सुरू झाला. (       )

३) पारंपारिक राज्यशास्त्र आदर्शवादी वर्णनात्मक आहे. (       )

## १.२.३ राज्यशास्त्राची व्याप्ती (The Scope of Political Science)

राज्यशास्त्रात राज्यसंस्था आणि शासन संस्था यासंबंधीचा अभ्यास केला जातो. प्रो. गेटेल, प्रो. गार्नर, सर फ्रेडरिक पोलॉक, एच. जे. मॉर्गेन्थॉ इत्यादी विचारवंतानी राज्यशास्त्राच्या व्याप्ती बाबत आपले विचार मांडले आहेत.

मानवाचे जीवन सुखी व्हावे म्हणून राज्य अस्तित्वात आले व मानवाचे जीवन पुर्णपणे सुखी होईपर्यंत ते अस्तित्वात राहील असे मत ग्रीक शास्त्रज्ञ ॲरिस्टॉलटने व्यक्त केले. समाजाचा घटक ह्या नात्याने व्यक्तीच्या कृतीचा व वर्तणुकीचा अभ्यास समाजशास्त्र करीत असते. व्यक्तीवर्तनाचा आणि कृतीचा अभ्यास करणारी सामाजिक शास्त्रे परस्पर संबंधित आहेत. राज्यशास्त्रामध्ये समाजाचा घटक आणि राज्याचा घटक या नात्याने व्यक्तीच्या राजकीय वर्तणुकीचा प्रामुख्याने अभ्यास होतो. १९४८ साली युनेस्कोने राज्यशास्त्राच्या अध्ययनासंबंधी परिसंवाद आयोजित केला होता. त्यावेळी अनेक विचारवंतानी राज्यशास्त्राच्या व्याप्तीसंबंधीचे विचार व्यक्त केला.

सामान्यत: राज्यशास्त्राच्या व्याप्तीत पुढील विषयांचा समावेश करण्यात येतो.

### १) राज्यसंस्थेचा अभ्यास

पारंपारिक राज्यशास्त्रात राज्य व शासनसंस्था हा अभ्यासाचा केंद्र होता. आज राज्यशास्त्र हे तशा अर्थाने अनौपचारिक आणि अशासकीय घटकांचा अभ्यास करत असले तरी राज्य आणि शासनसंस्थाचा अभ्यास काल बाह्य झालेला नाही. राज्य, राज्याचे सार्वभौमत्त्व, राज्याचे कायदे, राज्याला शक्ती देणारे

घटक, राज्य व शासन संबंध, राज्य व समाज, राज्य व शेजारील राष्ट्र अशा संदर्भात राज्याचा अभ्यास केला जातो.

## २) विविध राजकीय विचारप्रणाली

राज्यशास्त्रात विविध स्वरूपाचे राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचारप्रणालींचा अभ्यास केला जातो. लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, नाझीवाद, फॅसिझम, दहशतवाद, अराज्यवाद इत्यादी विचारप्रणालीचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. भूतकाळात घडलेल्या राजकीय घडामोडी, प्रचलित वर्तमान स्थिती यांचा विचार करून जी राजकीय तत्त्वे, सिद्धांत मांडले त्यांचा अभ्यास राज्यशास्त्रात करावा लागतो.

## ३) राज्य आणि नागरिक यांच्या संबंधाचा अभ्यास

राज्याची निर्मिती लोकहिताच्या दृष्टिकोणातून झाली आहे. व्यक्तीच्या संरक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी राज्यसंस्था आवश्यक व महत्त्वाची मानली जाते. राज्यातील लोक हा राज्यनिर्मितीचा महत्त्वाचा घटक मानला जातो. राज्यशास्त्रात नागरिक आणि राज्य यांच्या संबंधाचा अभ्यास केला जातो.

## ४) व्यक्तीचा अभ्यास

हॅरॉल्ड लास्कीने त्याच्या 'ग्रामर ऑफ पॉलिटिक्स' या ग्रंथात व्यक्तीच्या अभ्यासावर भर दिला होता. एकोनिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विशेषत: इंग्लंडमध्ये जे. एस. मिल, ग्रीन, मॅक्समूलर यासारख्या व्यक्तीवादी विचारवंताची मोठी लाट आणि होती. त्यांनी व्यक्तीवादा बरोबरच, व्यक्ति स्वातंत्र्य लोकसत्ताक कल्याणकारी व्यवस्थेवर भर दिला. भारतात न्या. रानडे व महात्मा गांधीनी व्यक्तीला तिच्या मूलभूत अधिकारांना महत्त्व दिले यातूनच व्यक्तिवादी तत्त्वज्ञानात भर घातली गेली. व्यक्ती हे विकासाचे ध्येय व राज्य हे साधन बनले.

## ५) राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास

राज्य राष्ट्र राजकीय व्यवस्था निश्चित विचारावर उभी असते. तो राजकीय विचारांची परंपरा जोपासत असतो. त्यावेळी या तत्त्वज्ञानात आवश्यक ते बदल करण्याचे धाडस दाखवत असतो. या तत्त्वज्ञानात काही छोटी मोठी मूल्ये, श्रद्धा, अस्मिता आणि सांस्कृतिक स्वरूपाचे धागेदोरे असतात. इंग्लंडने मर्यादित राजेशाही बरोबर लोकशाही तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला. भारताने लोकशाही बरोबर समाजवाद धर्मनिरपेक्षता यासारख्या तत्त्वज्ञानाचे प्रयोग केले. या सर्व तत्त्वप्रणाली व बदलांचा अभ्यास राज्यशास्त्रात होतो.

### ६) सार्वभौमत्त्वाचा अभ्यास

सार्रभौमत्त्वाचे स्वरूप, प्रकार, सिद्धांत याविषयी राज्यशास्त्रात अभ्यास केला जातो. ऑस्टिनच्या सार्वभौमत्त्वाचा सिद्धांत, अनेकसत्तावाद, सार्वभौमत्त्वाची लक्षणे आणि मर्यादा इत्यादी स्वरूपाचा अभ्यास राज्यशास्त्राच्या व्याप्तीत आढळून येतो.

### ७) आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास

राज्या-राज्यांतील संबंध, आंतरराष्टीय संघर्ष, आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय शांतता, जागतिक राजकारण, विश्वराज्याची कल्पना इत्यादी स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

### ७) स्थानिक राज्यकारभार आणि कल्याणकारी राज्य

स्थानिक राज्यकारभाराचे स्वरूप, ग्रामीण प्रशासन, नागरी प्रशासन, स्थानिक प्रशासनाचे महत्त्व, सत्तेचे विकेंद्रीकरण, कल्याणकारी राज्य इत्यादी स्वरूपाचा अभ्यास राज्यशास्त्राच्या व्याप्तीत समाविष्ट केला जातो.

### ९) राजकीय वर्तनाचा अभ्यास

२० व्या शतकातील सुरूवातीला वर्तनवादी चळवळीने राज्यशास्त्रात मोठी क्रांती केली. ग्रॅहम वॉलासने 'ह्यूमन नेचर इन पृलिटिक्स' हा ग्रंथ लिहून राज्यशास्त्राची व्याप्ती आंतरशास्त्रीय बनवली यात लास्की, डेव्हिड ईस्टन, रॉबर्ट डाल, मॅक्स वेबर इत्यादी विचारवंतानी भर घातली या वर्तनवादी अभ्यास पद्धतीमध्ये प्रत्यक्ष व्यक्तीचे राजकीय वर्तन तपासून सिद्धांत तथा निष्कर्ष मांडावेत असा आग्रह राज्यशास्त्रात धरला जावू लागला. अशा प्रकारे राज्यशास्त्राच्या व्याप्तीमध्ये राजकीय वर्तनाला महत्त्व आले.

वरील विविध विषयासंबंधीच्या अभ्यासाचा समावेश राज्यशास्त्राच्या व्याप्तीत केला जातो. आधुनिक काळात राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी नवनवीन पद्धतीचा स्वीकार केला जात आहे अशा रीतीने अनेक पद्धतीने राज्यशास्त्राचा अभ्यास केला जात आहे. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे स्वरूप अधिक व्यापक होत आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - २

पुढील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.

१) जे. डब्ल्यु. गार्नर यांनी केलेली राज्यशास्त्राची व्याख्या सांगा.

२) पारंपारिक राज्यशास्त्राची दोन वैशिष्ट्ये सांगा.

३) कोणत्या विचारवंतानी राज्यशास्त्राला स्वतंत्र सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला ?

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

वस्तुनिष्ठता : आधुनिक काळात राज्यशास्त्र शास्त्रीय बनत चालल्याने राज्यशास्त्राचा अभ्यास सूक्ष्म पद्धतीने होत असे अचूक पद्धतीची किंवा संख्यात्मक पद्धतीने मांडणी म्हणजे वस्तुनिष्ठता.

औपचारिक राज्यशास्त्र : राज्यशास्त्रातील राज्य, शासन या मूळ संस्था आहेत. या संस्थांचा अभ्यास म्हणजे औपचारिक राज्यशास्त्राचा अभ्यास.

अनौपचारिक राज्यशास्त्र : जे विषय रूढ अर्थाने राजकीय नसतात अशा बिगर राजकीय संस्था वा घटनांचा अभ्यास अनौपचारिक प्रकारात केला जातो.

सिद्धांत : सिद्धांत म्हणजे त्या विशिष्ट क्रिया-प्रक्रिया बाबत असणारे दृष्टिकोन, लोकांची मते की जी शास्त्रीय, अचूक व कार्यकारण भावावर आधारित आहेत.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

### १) स्वयं-अध्ययन प्रश्न -१

(१) बरोबर

(२) चूक

(३) बरोबर

### २) स्वयं-अध्ययन प्रश्न -२

(१) जे. डब्ल्यु. गार्नर यांच्या मते राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा प्रारंभ राज्यापासून होऊन त्याचा शेवटही राज्याच्या अभ्यासातच होतो.

(२) अ) पारंपारिक राज्यशास्त्र तात्त्विक, आदर्शनिष्ठ व गुणात्मक होते.

ब) पारंपारिक राज्यशास्त्रात सामाजिक शास्त्रांच्या आंतरसंबंधांचा अभ्यास केला जात नाही.

(३) ॲरिस्टॉटल या विचारवंताने राज्यशास्त्राला स्वतंत्र सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला.

## १.५ सारांश

प्राचीन ग्रीक कालखंडापासून राज्यशास्त्राचा अभ्यास केला जात आहे. सामाजिक शास्त्रांतर्गत राज्यशास्त्र ही एक महत्त्वाची अभ्यास शाखा आहे. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला स्वतंत्र्य सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला. पारंपारिक राज्यशास्त्रात राज्यशास्त्र मर्यादित होते. राज्य व्यवस्था, शासन व्यवस्थांना पोलिसी प्रकारची संरक्षणाची मर्यादित कामे होती. समाजाच्या गरजा कमी होत्या. समाज प्रबोधन नव्हते. लोकसंख्या व विज्ञान मर्यादित होते. त्यामूळे राज्यशास्त्र ही मागास होते. त्यावेळी राज्यशास्त्र हे वर्णनात्मक, नैतिक, तार्कीक, अशास्त्रीय होते. विसाव्या शतकात मात्र ते विकास पावले. लोकसंख्या वाढ, विज्ञान-तंत्रज्ञानातील वाढ, आंतरशास्त्रीयता प्रयोगशीलता, गणिती पद्धती यामुळे ते शास्त्रीय व व्यापक होत आहे. व्यक्तीपासून आंतरराष्ट्रीय संस्था संघटनापर्यंत सर्वच घटकांचा राज्यशास्त्रात अभ्यास केला जातो. सतत नवीन व्यवस्था व लोककल्याणकारी तत्त्वज्ञानाचा, सिद्धांताचा शोध घेण्यात राज्यशास्त्राचे महत्त्व सुरक्षित आहे. राज्यशास्त्राची ही प्रयोगशीलता, राज्यशास्त्राचे महत्त्व वाढविण्यासाठी उपयोगाची आहे. राज्यशास्त्र हे समाजाला मार्गदर्शन करते. राज्यशास्त्रातील तत्त्वज्ञान समाजात परिवर्तन करते. फ्रेंच क्रांती, रशियन क्रांती, भारतीय स्वातंत्र्य क्रांतीच्या पाठीमागे निश्चित स्वरूपाचे तत्त्वज्ञान होते.

राज्यशास्त्राचे स्वरूप समजून घेताना राज्यशास्त्र हे पारंपारिक, संक्रमण व आधुनिक कालखंडातून गेल्याचे दिसते. पारंपारिक राज्यशास्त्र हे काळाच्या ओघात विकास पावत गेले. समाज बदलला की शासन संस्था तत्त्वप्रणाली व प्रत्यक्ष राजकारणातही अमूलाग्र बदल होतात. संक्रमण काळात सामाजिक व्यवहार आणि राजकीय व्यवहार यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यासातून राज्याची निर्मिती, विकास यांचा अभ्यास केला. विसाव्या शतकात राज्यशास्त्राचा अभ्यास आधुनिक पद्धतीने सुरू केला. वैज्ञानिक पद्धती, तुलनात्मक पद्धती, सामाजिक, आर्थिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोन, आंतरशास्त्रीय संबंधाचा दृष्टीकोन, संख्याशास्त्रीय पद्धती इत्यादी पद्धतीचा स्वीकार करून राज्यशास्त्राचा अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने सुरू झाला. निरीक्षण, परीक्षण संशोधन करून वास्तववादी दृष्टीकोनातून राज्यशास्त्रात निष्कर्ष काढले जाऊ लागले.

पारंपारिक राज्यशास्त्राची व्याप्ती मर्यादित होती, परंतु विसाव्या शतकातील सार्वत्रीक, सामाजिक, तांत्रिक, वैज्ञानिक व राजकीय क्रांतीमुळे राज्यशास्त्रात आमुलाग्र बदल झाला. संस्था संघटना व फक्त शासनाचा अभ्यास करणारे राज्यशास्त्र शासनसंस्थे बरोबर इतर सर्वच औपचारिक अराजकीय घटकाचांही अभ्यास सुरू झाला. यात व्यक्ती, राज्य, शासन संस्था, संघटना, प्रशासन, पक्ष, दबावगट, राज्यघटना, तत्त्वज्ञान, साहित्य, संस्कृती, वर्तन इत्यादी अनेक घटकांचा अभ्यास सुरू झाला. वाढत्या गुंतागुंतीच्या आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या कालखंडात राज्यशास्त्र व्यापक बनत आहे तसेच राज्यशास्त्राचे महत्त्व वाढत आहे.

थोडक्यात राज्यशास्त्र हे एक महत्त्वाचे सामाजिक शास्त्र आहे. राज्यशास्त्र हे व्यक्तीपासून शासनापर्यंत व स्थानिक राजकारणापासून आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था संघटनेपर्यंतच्या अनेक राजकीय घडामोडीचे विश्लेषण करते. विसाव्या शतकात वाढत्या स्पर्धेत व सत्तेच्या राजकारणात कल्याणकारी राज्य व्यवस्था निर्माण करण्याला मार्गदर्शन करते.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१) राज्यशास्त्राचा अर्थ सांगा.

२) राज्यशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.

३) राज्यशास्त्राची व्याप्ती सांगा.

४) पारंपारिक राज्यशास्त्रातील उणिवा सांगा.

## १.७ संदर्भ पुस्तके


1. Garner J.W., Political Science and Government, First Edition, 1951.
2. Bluntschill, J. K., The theory of the State, Third Edition, Oxford, 1995.
3. Verma S. P., Modern Political Theory. Vikas Publication House Pvt. Ltd., Delhi.
4. E. Barker, Principles of Social and Political Theory, Calcutta, Oxford University.
5. Johari J.C., Contemporary Political Theory, Sterling Publishers, New Delhi, 1995.
6. Kapur A.C., Principle of Political Science, S Chand & Co. Ltd., New Delhi.

७. गर्दे दि. का., बाचल वि.मा., आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, १९७५.

८. भोळे भा. ल., राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, २००२.

९. गोखले रा.म., राज्यशास्त्राची मुलतत्त्वे, भाग १ व २.

१०. वरांडकर र. घ., राजकीय सिद्धांताची मुलतत्त्वे.


❑ ❑ ❑